संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवा काळ

।। न मे भक्त प्रणश्यति ।।

# आता वस्तूसेवा कर कमी करण्याची वेळ

एप्रिलपासून सुरू झालेले आर्थिक वर्ष बरेच अनर्थकारी ठरण्याची लक्षणे दिसत आहेत. अमेरिका, इराण युद्धानंतर जागतिक स्तरावर बदललेल्या परिस्थितीचे काही महत्त्वपूर्ण परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होत आहेत. प्रामुख्याने इंधन टंचाई आणि त्यातून अनिवार्यपणे उद्‌भवलेली इंधनाची दरवाढ हे भारताच्या ग्रोथ इंजिनचा वेग मंदावेल की काय अशी परिस्थिती दिसते आहे. देशाच्या पंतप्रधानांनीच येणाऱ्या काळातल्या काही समस्यांची जाणीव करून दिलेली आहे. सरकार करीत असलेले प्रयत्न कदाचित पुरेसे ठरणार नाहीत किंवा सरकारच्या एकट्याच्या प्रयत्नावर परिस्थिती नियंत्रणात राहू शकणार नाही, याकरीता देशातील प्रत्येक नागरिकाचे सहकार्य पंतप्रधानांना गरजेचे वाटलेले दिसते. साधारणपणे गेल्या महिनाभरात अनेक वस्तूंची टंचाई आणि जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीतली दरवाढ आपले रंग दाखवू लागलेली आहे. इंधन दरवाढीचे परिणाम केवळ जीवनावश्यक वस्तूपुरतेच मर्यादित राहात नाही तर त्याचा सर्वच क्षेत्रांवर हळुहळू परिणाम दिसू लागला आहे. येणारा पावसाळा त्यातला खरीपाचा हंगाम, जून पासून सुरू होणारे शैक्षणिक वर्ष या प्रमुख क्षेत्रांवर इंधन दरवाढीचे सावट घोंघावू लागलेले आहे. सरकार सर्वतो प्रयत्न करून खते, बी-बियाणे यांच्या किमती वाढणार नाहीत यासाठी प्रयत्न करीत आहेत. तरीदेखील काही ना काही प्रमाणात दरवाढ अटळ ठरते आहे. तर दुसरीकडे या शैक्षणिक वर्षात पाठ्यपुस्तकांपासून ते अनेक प्रकारच्या शैक्षणिक साहित्यातसुद्धा पाच दहा टक्क्यांची वाढ होऊ शकते. स्कूल बसेस संघटनांनी आताच पंधरा टक्के दरवाढ करण्याचे जाहीर केले. म्हणजेच वाढते शैक्षणिक शुल्क आणि शिवाय शैक्षणिक साहित्यातली दरवाढ असा दुहेरी भडीमार पालकांवर होऊ घातला आहे. या परिस्थितीचे कारण पुढे करून खाजगी शैक्षणिक संस्थासुद्धा आपला स्वार्थ साधून घेण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. कारण आज महाराष्ट्रातसुद्धा जवळपास साठ टक्के खाजगी शैक्षणिक संस्थांकडून शैक्षणिक साहित्य आणि त्यांच्याच स्कूल बसेसचा वापर करण्याची सक्ती केली जाते. संपूर्ण वर्षाचे लाख दीड लाख रुपये शुल्क घेतले जाते या शुल्कातील वाढीचेही संकेत मिळू लागले आहेत.

### काटकसरीचीच सरकारची कसोटी

येत्या वर्षभरामध्ये या सगळ्याच समस्यांची तीव्रता वाढतच जाईल. अशा परिस्थितीत सरकारने सुचवलेल्या काटकसरीच्या उपाययोजना आणि वाढती महागाई हा परस्पर विरोध अधिकच चिंता निर्माण करणारा ठरू शकतो. महागाई झाली की, आपोआपच काही वस्तूंच्या वापरावर मर्यादा येतात. परंतु ज्या जीवनावश्यक वस्तू आहेत. ज्या वस्तूंना कोणतेही पर्याय नाहीत. त्याच्यामध्ये काटकसर करता येणेदेखील शक्य होत नाही. म्हणजेच अशा काही वस्तूंच्या संदर्भात सरकारने काही वेगळे निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. सामान्य जनतेच्या महिन्याच्या खर्चावर या इंधन दरवाढीने नियंत्रण आणायला सुरूवात केलेली आहे. परंतु त्यातून होत जाणारी महागाई ही सामान्यांचा खिसा रिकामा करणारी ठरते. महागाईही सहन करा आणि काटकसरही करा, अशा पद्धतीने सामान्यांना कात्रीत पकडण्याचा प्रयत्न होतो आहे. जर देशातील सामान्य माणसांच्या जनजीवनावर या गोष्टींचा फार परिणाम होऊ द्यायचा नसेल तर सरकारला स्वतः काटकसर करावी लागेल. ती काटकसर सरकारच्या उत्पन्नामध्ये किंवा महसूलामध्ये करता येऊ शकते. गेल्या तीन चार वर्षापासून सगळ्याच वस्तूंवरच्या वस्तू सेवाकरामध्ये वाढ होत गेली आणि दरवर्षी वस्तू सेवाकराचे उत्पन्न सतत काही हजार कोटींनी वाढत गेलेले आहे. सरकारने अगदी काटेकोरपणे जास्तीत जास्त वस्तू सेवाकराच्या अंतर्गत कशा येतील याचे नियोजन केले त्यात जीवनावश्यक अशा अनेक वस्तूंचा समावेश आहे. आता अशी वेळ आलेली आहे की, महागाई नियंत्रणात आणण्याबरोबरच केंद्र सरकारने लावलेल्या करामध्ये कपात करण्याची आवश्यकता आहे. तीन आठवड्यांपूर्वी इंधनावरच्या शुल्कात सरकारने कपात केली होती. तरीदेखील इंधनाचे दर विशेषतः पेट्रोल-डिझेलचे दर वाढतच असल्याने ते रोखून धरणे केंद्र सरकारलाही शक्य होण्यासारखे दिसत नाही. अशा परिस्थितीत किमान महागाई नियंत्रणात आणण्याकरीता जर वस्तू सेवाकरामध्ये कपात केली तर किमती नियंत्रणात राहू शकतील. म्हणजे सामान्य माणसाच्या महिनाभराच्या खर्चाचा ताळमेळ ठेवता येऊ शकेल.

### सर्वाधिक झळ सामान्यांनाच

वस्तू सेवाकरातून केंद्राला आतापर्यंत विक्रमी महसूल मिळालेला आहे. त्यातला काही वाटा हा राज्य सरकारांना दिला जातो. म्हणजेच राज्य सरकारांना मिळणाऱ्या हिस्स्यावरही परिणाम होऊ शकेल. थोडक्यात केंद्र आणि राज्य सरकारांना मिळणाऱ्या महसूलात कपात होईल. ही कपात झाल्यावर अनाठायी होणारे सरकारी खर्चदेखील नियंत्रणात राहातील म्हणजे तिथे आपोआपच काटकसर होऊ शकेल. संभाव्य परिस्थितीचा विचार केला तर टंचाई आणि महागाई या कचाट्यातून दिलासा मिळण्याकरीता हा एक पर्याय ठरू शकतो. वस्तू सेवाकराचे ओझे कमी झाले. तर वस्तूंच्या किमती आपोआप खाली येऊ शकतील. परंतु दुर्दैवाचा भाग असा आहे की, सरकार लोकांना काटकसर करायला सांगते आहे. मुळातच मर्यादित उत्पन्न असलेला सामान्य माणूस काटकसर करूनच जीवन जगत असतो. आता खरी काटकसर करण्याची कसोटीची वेळ केंद्र आणि राज्य सरकारवर आलेली आहे. अगदी तेल कंपन्यांना होणारा भरमसाठ नफा अशा परिस्थितीत लक्षात घ्यावा लागेल आणि खर्च भरून निघेल एवढ्याच उत्पन्नाची अपेक्षा ठेवून तेल कंपन्यांनादेखील आपल्या नफ्यात काटकसर करावी लागेल. सरकारने देशभरातल्या साठ ते सत्तर टक्के सामान्य मध्यमवर्गीय माणसाचा विचार करायला हवा. कारण या इंधनदरवाढीच्या परिणामांची झळ याच वर्गाला बसते. जसे शैक्षणिक साहित्यातल्या किंमतवाढीपासून ते रिक्षा-बसच्या भाडेवाढीपर्यंतचे चटके सहन करावे लागतात.